विशाळगडावरील हजरत पीर रेहान मिरासाहेब दर्गा येथे बकरी ईद व त्यानंतर पाच दिवस चालणाऱ्या उरुसाकरिता दिनांक २८.०५.२०२६ ते ०२.०६.२०२६ पर्यंत पशु-पक्षी अर्थात बकरे, कोंबडी यांचा बळी देण्यास किंवा कापण्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंच मा. न्यायमूर्ती रणजितसिंह राजा भोसले यांनी परवानगी देण्याचे आदेश आज झालेल्या सुनावणीअंती महाराष्ट्र शासन, जिल्हाधिकारी कोल्हापूर, तहसीलदार शाहूवाडी, पोलीस निरीक्षक शाहूवाडी, संचालक पुरातत्व विभाग यांस आदेश देण्यात आला

पोलीस निरीक्षक शाहूवाडी यांनी दिनांक ०८.०५.२०२६ रोजी काही हिंदुत्ववादी संघटना विशालगडावर जाऊन स्थानिक नागरिकांची सुरक्षा धोक्यात येईल या भीतीने तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शाहूवाडी यांच्याकडे विशाळगड येथे कोणतेही सार्वजनिक कार्यक्रम करण्यास दिनांक १३.०५.२०२६ पासून ते १५.०५.२०२६ पर्यंत बंदी आदेश लागू होणेस विनंती केली होती. त्यानुसार तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शाहूवाडी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे बंदी आदेश बुधवार दिनांक १२.०५.२०२६ ते दिनांक १८.०५.२०२६ पर्यंत लागू करण्याचे आदेश निर्गमित केले होते.

पोलीस अधीक्षक कोल्हापूर यांनी जिल्हा दंडाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे अहवाल सादर करून कोल्हापूर जिल्हयात विविध हिंदुत्ववादी पक्ष संघटना यांचेकडून विविध मागण्या करण्यात आल्या होत्या. मागण्यात आंदोलन, उपोषण मोर्चा इ.  प्रकारचे आंदोलने करण्यात येतील असा आशय होता. हिंदुत्ववादी विविध पक्षांकडून रॅली, सभेचे आयोजन करण्यात येते सदर वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्याचे सांगण्यात आले होते. निरनिराळ्या जाती धर्मातील लोकांच्या नैतिक भावना दुखावल्या जाऊन त्याच्यामध्ये भांडण-बखेडे निर्माण होऊन शांततेस अगर सुव्यवस्थेस बाधा येईल अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. म्हणून अप्पर जिल्हा दंडाधिकारी, कोल्हापूर यांनी दिनांक १९.०५.२०२६ ते ०२.०६.२०२६ पर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ अन्वये अधिसुचनेद्वारे बंदी आदेश काढण्यात आले होते. तसेच तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी शाहूवाडी यांनी देखील भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे

कलाम १६३ प्रमाणे दिनांक २६.०५.२०२६ ते ०८.०६.२०२६ पर्यंत १४ दिवसांकरिता पशु-पक्षी यांचे बळी देण्यास किंवा कापण्यास, अन्न शिजवण्यास, स्वयंपाकाची चूल मांडण्यास व पेटवण्यास अधिसूचनेद्वारे मनाई आदेश निर्गमित केले होते. त्याचप्रमाणे पोलीस निरीक्षक, शाहूवाडी पोलीस ठाणे यांनी देखील दिनांक २६.०५.२०२६ च्या पत्र नुसार विशाळगडावरील दंगलीची पार्श्वभूमी विचारात घेता व विशाळगडावरील अतिक्रमणाच्या अनुसंघाने अचानक निर्माण होणारी कायदा व सुव्यवस्था परिस्थिती पाहता ऊरूससाठी व पशुबळी देण्यास तसेच त्या ठिकाणी आलेल्या भक्तांना व पर्यटकांना राहण्यास मागितलेली परवानगी नाकारण्यात आली.

शाहूवाडी पोलीस ठाण्याचा अहवाल, पोलीस अधीक्षक कोल्हापूर यांचा अहवाल व तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शाहूवाडी यांची अधिसूचना व त्याचप्रमाणे उप्पर जिल्हा दंडाधिकारी कोल्हापूर यांनी काढलेली अधिसूचना लक्षांत घेता विशाळगडावर बकरी ईद व त्यानंतर पाच दिवस चालणाऱ्या उरूस आदी उत्सवास पशु-पक्षी यांचा बळी देता येणार नाही असा युक्तिवाद महाराष्ट्र शासन कोल्हापूर जिल्हा प्रशासन व संचालक पुरातत्व यांच्या मार्फत मुंबई येथील मुख्य सरकारी वकील ॲड शिरीष हिरे, ॲड नेहा भिडे व सहायक सरकारी वकील ॲड शुभांगी देशमुख यांनी केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून विशाळगड येथील हजरत पीर मलिक रेहान मिरासाहेब दर्गा तर्फे बाजू मांडताना ॲड सतीश तळेकर यांनी सांगितले कि भारतीय राज्यघटनेतील कलम २५ नुसार धर्माचे स्वात्यंत्र दिले आहे ते फक्त नितीमत्ता एवढ्या करीत गमावली जाऊ शकते. “कायदा व सुव्यवस्था व सर्वजणी सुव्यवस्था” या दोन संकल्पपण वेगळ्या असून त्यात खूप काही अंतर आहे. कायदा व सुव्यवस्था राखणे हे राज्यातील पोलिसांचे कर्तव्य असून त्यांनी धार्मिक समारंभ सार्वजनिक कार्यक्रम, लग्न यात्रा सण इ. व्यवस्थतीत पार पाडता येतील म्हणून खबरदारी घ्यावयास हवी सर्व जाती धर्माचे सण, उत्सव यात्रा ई. हे शांततामय वातावरणामध्ये साजरे होण्याकरिता जमा होणार समुदाय यांच्यावर देखरेख करण्याची जबाबदारी पोलिसांची आहे त्यामुळे घटनेने दिलेले धर्म बाबतचे स्वातंत्र्य हे उप्पर जिल्हा दंडाधिकारी कोल्हापूर किंवा तालुका कार्यालकरी दंडाधीकरी शाहूवाडी याना अधिसूचना काढून हिरावून घेता येणार नाही असा युक्तिवाद दर्ग्या तर्फे सतीश तळेकर यांनी केला.

यापूर्वी उच्च न्यायालयाने बकरी ईद, उरूस तसेच पशु-पक्षी  यांचा बळी  देण्यास परवानगी देण्यात आली होती तशी परवानगी या वर्षी नाकारता येणार नाही असा हि युक्तिवाद केला. ॲड श्री. सतीश तळेकर यांनी पुढे जाऊन पशु-पक्षी बळी देण्यात येणाऱ्या जागेत झालेला कचरा साफ करण्यात येईल पशु-पक्ष्यांच्या उर्वरित अवशेष यांचाहि  विल्हेवाट लावण्यात येईल व उरूस साजरा करत असताना पोलिसांना सर्वोत्तरपरी मदत करण्यात येईल अशी दर्ग्या तर्फे ग्वाही देण्यात आली

उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मा. न्यायमूर्ती श्री. रणजितसिंह राजा भोसले यांनी मागणीप्रमाणे याही वर्षी पशु-पक्षी यांचा बळी देण्यास व उरूस साजरा करण्यास मागील अटीवर परवानगी देण्यात यावी असा आदेश दिला मात्र मुख्य प्रकरणाची लवकरात लवकर अंतिम सुनावणी घेण्याकरीता ०८.०६.२०२६ रोजी नियमित कोर्टासमोर अंतिम सुनावणीची तारीख निश्चित करण्याकरिता आदेश केला.